**ठळक बातम्या**

- पाकिस्तानात दहशतवादी लपून राहू शकतील अशी जागा उरली नसल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, हवाईदल जवानांशी साधला संवाद

- नैसर्गिक वाळूचा अतिउपसा रोखण्यासाठी कृत्रिम वाळू धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी /मुकेश खुल्लर समितीचा अहवाल स्वीकारला

- राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता१०वीच्या परीक्षेत ९४ पूर्णांक १० शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार २८२ अंकाची घसरण

- आयपीएल क्रिकेट सामने येत्या शनिवारपासून पुन्हा सुरु होणार

**आणि**

- नैर्ऋत्य मोसमी पाऊस दक्षिण अंदमान समुद्रात दाखल

**<><><><><>**

दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून टिपण्याचं सामर्थ्य भारताकडे असून पाकिस्तानात दहशतवादी लपून राहू शकतील, अशी जागा आता उरली नसल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंजाबमधे आदमपूर इथं हवाईदलाच्या तळावर ते आज सैनिकांशी संवाद साधत होते. ऑपरेशन सिंदूर मधे सेनादलांनी बजावलेल्या कामगिरीचा, सैनिकांच्या शौर्य, धैर्य आणि युद्धकौशल्याचा त्यांनी गौरव केला. ऑपरेशन सिंदूर मुळे देशभरात अभिमान आणि एकीची भावना अधिक बळकट झाली, तसंच दहशतवादाला आश्रय देणाऱ्यांना धडा मिळाला असल्याचं ते म्हणाले.....

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री ( २४ सेकंद)**

**<><><><><>**

'ऑपरेशन सिंदूर' बाबत जनजागृतीच्या उद्देशानं भारतीय जनता पक्षानं आजपासून देशभरात जनजागृती मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेला त्यांनी 'तिरंगा यात्रा' असं नाव दिलं असून पाकिस्तानविरोधात भारतीय लष्करानं केलेल्या यशस्वी कारवायांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. राजधानी दिल्लीतल्या कर्तव्यपथावर आज संध्याकाळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

नैसर्गिक वाळूच्या अतिउपशामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय संकटांना आळा बसावा, तसंच बांधकाम क्षेत्राला पर्यायी आणि टिकाऊ साधन उपलब्ध व्हावं यासाठी राज्यात कृत्रिम वाळूचं उत्पादन आणि वापर धोरणाला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या वेतनातल्या त्रुटी दूर करण्यासाठी स्थापन केलेल्या मुकेश खुल्लर समितीचा अहवाल मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत स्वीकारला. राज्यातल्या शासकीय आणि इतर कर्मचाऱ्यांना केंद्राच्या सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी १ जानेवारी २०२६ पासून लागू झाल्या होत्या. मात्र त्यानंतर वेतननिश्चिती आणि सुधारित वेतनश्रेणीबाबत काही त्रुटी आढळल्या होत्या. त्यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयानं दिलेल्या निकालानुसार शासनानं मुकेश खुल्लर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन केली होती.

राष्ट्रीय न्यायपूरक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातल्या उपकेंद्रासाठी नागपूर जिल्ह्यातल्या चिंचोली इथं २० हेक्टर पेक्षा जास्त जागा द्यायचा निर्णय मंत्रिमंडळानं

आज घेतला. तसंच, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरतं पथक योजनेलाही राज्य मंत्रिमंडळानं हिरवा कंदील दाखवला.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा म्हणजेच इयत्ता दहावीचा निकाल आज जाहीर झाला. त्यात ९४ पूर्णांक १० शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्याच्या नऊ विभागीय मंडळातून १५ लाख ४६ हजार ५७९ नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १४ लाख ५५ हजार ४३३ जण उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षी पेक्षा यंदाच्या निकालात १ पूर्णांक ७१ शतांश टक्के घसरण झाली आहे. यावर्षीही मुली उत्तीर्ण होण्याचं प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी ९६ पूर्णांक १४ शतांश टक्के इतकी आहे. तर ९२ पूर्णांक ३१ शतांश टक्के मुलं उत्तीर्ण झाली आहेत.

यंदाही कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक, ९८ पूर्णांक ८२ शतांश टक्के इतका आहे. तर सर्वात कमी निकाल हा नागपूर विभागाचा लागला आहे.

विभागनिहाय टक्केवारीत **पुणे विभाग** -९४ पूर्णांक ८१ शतांश, **नागपूर** - ९० पूर्णांक ७८ शतांश, **छत्रपती संभाजीनगर** ९२ पूर्णांक ८२ शतांश, **मुंबई** ९५ पूर्णांक ८४ शतांश, **कोल्हापूर** - ९६ पूर्णांक ७८ शतांश, **अमरावती** - ९२ पूर्णांक ९५ शतांश, **नाशिक** - ९३ पूर्णांक ०४ शतांश, लातूर - ९२ पूर्णांक ७७ शतांश टक्के इतका निकाल लागला आहे.

केंद्रीय शिक्षण मंडळाच्या १० वी १२ वी च्या परीक्षेचा निकालही जाहीर झाला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज १ हजार २८२ अंकाची म्हणजेच सुमारे दीड टक्के घसरण नोंदवत ८१ हजार १४८ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी देखील ३४६ अंकांनी घसरून २४ हजार ५७८ अंकावर बंद झाला.

मुंबई शेअर बाजारात आज २ हजार ५५९ कंपन्यांचे शेअर्स वधारले. १ हजार ४०२ कंपन्यांचे शेअर्स घसरले, आणि १४० कंपन्यांचे शेअर्स स्थीर राहिले.

<><><><>

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ-बीसीसीआयनं आयपीएल स्पर्धेचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं आहे. या वेळापत्रकानुसार येत्या शनिवारी म्हणजे १७ मे पासून पुन्हा एकदा आयपीएल स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या दिवशी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि कोलकता नाईट रायडर्स संघांमध्ये बेंगळुरू इथं सामना होईल. तर ८ मे रोजी धरमशाला इथं पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स संघांमध्ये अर्ध्यावर सोडलेला सामना आता २४ मे रोजी जयपूरला होणार आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ९ मे पासून आयपीएलचे उर्वरीत सामने स्थगित केले होते. आता पुन्हा एकदा हे सामने खेळले जाणार आहेत.

<><><><>

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने ९४ पदकांसह पदकतालिकेतलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. यात ३६ सुवर्ण, ३० रौप्य आणि २८ कांस्यपदकांचा समावेश आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्र पदकतालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. या स्पर्धेचा आजचा दहावा दिवस असून आज झालेल्या जिमनॅस्टिक्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या परिना हिने सुवर्णपदक जिंकलं आहे. याच स्पर्धेत महाराष्ट्राच्या देवांगी पवार हिने कांस्य पदकाची कमाई केली

आहे. बॉल जिमनॅस्टिक्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या किमया कारळे हिने सुवर्ण पदक जिंकलं असून परिनाला रौप्य पदक मिळालं आहे.

<><><><><>

देशाच्या प्रगतीला चालना देण्यासाठी देशातलं ऊर्जाक्षेत्र आधुनिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि भविष्याच्या दृष्टीनं सज्ज असायला हवं, असं मत केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल यांनी आज मांडलं. पश्चिम प्रभागातल्या राज्यांच्या स्थानिक ऊर्जा परिषदेत ते आज मुंबईत बोलत होते. अशा स्थानिक परिषदांमुळे त्या त्या ठिकाणच्या समस्या सोडवायला मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आज निवृत्त झाले. १० नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांनी पदभार स्वीकारला होता. निवृत्तीनंतर आपण कोणतंही लाभाचं पद स्वीकारणार नाही असं खन्ना यांनी स्पष्ट केलं असून कायद्याच्या क्षेत्रात कार्यरत राहण्याचा मनोदय व्यक्त केला आहे.

<><><><><>

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्यावतीनं दरवर्षी बुद्ध पौर्णिमेला चंद्रप्रकाशाच्या लख्ख प्रकाशात प्राणीगणना केली जाते.यामध्ये एका मचाणावर दोन निसर्गप्रेमींना मुक्कामाची संधी दिली जाते. काल या उपक्रमात १६५ पर्यटकांनी ८१ मचाणीवरून निसर्ग अनुभव घेत प्राणी गणना केली. यावर्षी ‘कोअर झोन’ वगळता ‘बफर’ क्षेत्रातल्या चंद्रपूर, मूल, मोहर्ली, खडसंगी, पळसगाव आणि शिवणी या सहा परिक्षेत्रातल्या मचाणांवर हा उपक्रम राबवण्यात आला.

<><><><><>

राज्याच्या विविध भागात आज वळवाच्या पावसाने हजेरी लावली. मुंबईच्या पूर्व उपनगरात आज सकाळी नऊ वाजल्यापासून अवकाळी पावसाच्या जोरदार

सरी पडल्या. भारतीय हवामान विभागानं मुंबई शहरात आज आणि उद्यासाठी यलो अलर्ट जारी केला असून, शहरात वादळी वारे, गडगडाट, आणि हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवली आहे.

**नाशिक** शहर आणि परिसरात सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पाऊस झाला. आज दुपारनंतर ढगाळ वातावरण झालं आणि पावसाला सुरूवात झाली. अल्पावधीतच मुसळधार पाऊस झाल्याने शहरातले अनेक रस्ते बंद झाले असून मोठी झाडं उन्मळून पडली .

**पुणे** शहर आणि परिसरातही मुसळधार पाऊस झाल्याचं वृत्त आहे.

<><><><><>

नैर्ऋत्य मोसमी पावसाने बंगालच्या उपसागरातला दक्षिण भाग व्यापला असून दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटं आणि उत्तर अंदमान सुद्राच्या काही भागात तो पोहोचला आहे. पुढच्या ३-४ दिवसात मान्सून आणखी पुढे सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

कोकणात उद्या सकाळपर्यंत विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा तसंच हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस अपेक्षित आहे.

//<><><><><>//